सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!
# ग्लोबल महातेज
Postal Regd. No. JAL/443/2025-2027
https://epaper.globalmahatej.com/
RNI. NO. MAHBIL /25/A0192
वर्ष १ ले | अंक : १८१ | मंगळवार, दि. २४ मार्च २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

आजचे अभीष्टचिंतन





**श्री. रवींद्र बोरसे**
लोकमत, अमळनेर



**श्री. जयेशकुमार काटे**
जिल्हा संघटक (VOM)



**प्रा. डॉ. धीरज वैष्णव**
प्रताप महाविद्यालय, अमळनेर



**श्री. कपिल विसपुते**
अमळनेर



**श्री. भूषण चौधरी**
दुबई



**श्री. राजेश कोठावदे**
अमळनेर

## श्री मंगळग्रह मंदिरात लक्ष्मी पंचमी याग





अमळनेर : श्री मंगळग्रह मंदिरात सोमवार, दि. २३ मार्च रोजी चैत्र नवरात्रीनिमित्त लक्ष्मी पंचमी याग झाला. चैत्र नवरात्रीतील पाचव्या दिवशी हा याग केला जातो. धन, समृद्धी आणि सौभाग्याची देवी महालक्ष्मी मातेच्या विशेष उपासनेसाठी हा दिवस अत्यंत शुभ मानला जातो. भाजपचे अमळनेर सरचिटणीस देवाभाऊ लांडगे यांनी सपत्नीक विधिवत मंत्रोपचाराच्या माध्यमातून लक्ष्मी मातेचे हवन/याग, श्रीसूक्त आणि कनकधारा स्तोत्राचे पठण केले. मंदिराचे पुरोहित प्रसाद भंडारी, शुभम वैष्णव, परशुराम शर्मा, गणेश जोशी, वैभव लोकाक्षी, हेमंत गोसावी यांनी पौरोहित्यासह भक्तिगीते म्हटली. अक्षय जोशी यांनी त्यांना ढोलकीवर साथ दिली, तर उमेश पाठक यांनी त्यांना सहकार्य केले.


(छायाचित्रे : मयूर चौधरी)

# अमळनेरमधील चार शाळा केल्या 'सील'
## पालिकेचे चाळीस लाख रुपये भाडे थकविणे भोवले; वसुली मोहिमेंतर्गत कारवाई

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : सुमारे ४० लाख रुपये भाडे थकविल्याने येथील पालिकेने चार शाळांवर कारवाई करून 'सील' केल्या आहेत. रविवार, दि. २२ मार्च रोजी ही कारवाई करण्यात आली. सध्या मार्चअखेर असल्याने पालिकेतर्फे वसुली मोहीम तीव्र करण्यात आली असून, थकबाकीदारांविरुद्ध कारवाई केली जात आहे.

याबाबत अधिक माहिती अशी, की पालिकेकडून पाणीपट्टी थकबाकीदारांचे नळ कनेक्शन कापणे तसेच मालमत्ता कर व भाडे थकबाकीदारांच्या मालमत्ता सील करण्याची मोहीम सुरू आहे. रविवारी मुख्याधिकारी गणेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली मिळकत व्यवस्थापक लौकिक समशेर, वरिष्ठ लिपीक विजय बागूल, राजू वानखेडे व मनोज सोनार यांच्या पथकाने मुंदडा इंग्लिश मीडियम स्कूल, छत्रपती शिवाजी महाराज विद्यामंदिर-तांबेपुरा, न्यू इंग्लिश मीडियम स्कूल व अनिल अंबर उर्दू शाळा क्रमांक ११ या शाळांना 'सील' केले.



*अमळनेर : पालिकेचे भाडे थकविल्याने सोमवारी शाळेच्या प्रवेशद्वाराला 'सील' लावताना पालिका अधिकारी व कर्मचारी.* (छायाचित्र : रजनीकांत पाटील)

### नागरिकांनी थकबाकी त्वरित भरावी



पालिकेतर्फे सध्या सुटीच्या दिवशी सुद्धा शहरात वसुली मोहीम राबविली जात आहे. नागरिकांना कर भरणा करावयाचा असल्यास त्यासाठीची सुविधाही सुरू आहे. नागरिकांनी त्वरित थकबाकीची रक्कम भरावी अन्यथा जप्ती, 'सील' करणे, कुलूप लावणे आदी प्रकारची कारवाई केली जाईल.

**– गणेश शिंदे, मुख्याधिकारी, अमळनेर नगर परिषद.**

दरम्यान, मार्च महिना सुरू असून विद्यार्थ्यांच्या शालेय परीक्षा आता तोंडावर आल्या आहेत. अशा वेळी शाळांना 'सील' केल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. तसेच शिक्षकांची उपस्थिती, अध्यापन कार्य, वेतन व आयकर आदी प्रशासकीय बाबींवरही परिणाम होऊ शकतो, अशीही चर्चा नागरिकांत सुरू आहे.

## वावडेत शेतमजुराची विषप्राशनाने आत्महत्या

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील वावडे येथील नितीन युवराज भील (वय २७) या शेतमजुराने विषप्राशन करून आत्महत्या केली. ही घटना गुरुवार, दि. १९ मार्च रोजी दुपारी घडली. नितीन हा प्रवीण आत्माराम पाटील यांच्या शेतात कामाला गेला असताना दुपारी त्याने दादा पिरन भील या मित्राला मोबाईलवरून फोन करून सांगितले, की त्याने विषप्राशन केल्याने त्याला त्रास होत आहे. त्यामुळे युवराज भील, त्याचा भाऊ हे शेतात गेले व त्यांनी नितीनला तातडीने धुळे येथील शासकीय हिरे वैद्यकीय महाविद्यालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र, तेथे डॉ. हर्षदा बागूल, डॉ. वसावे यांनी तपासणी केली असता मृत घोषित केले. नितीन भील यांच्या काकांच्या फिर्यादीवरून मारवड पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# यूपीएससी उत्तीर्ण प्रेरणा खवळे यांचा लोणचारममध्ये भव्य नागरी सत्कार
## ग्रामस्थांसह विविध क्षेत्रांतील मान्यवरांचीही लाभली उपस्थिती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर सन २०२५ मध्ये झालेल्या यूपीएससी परीक्षेत ९१३ वा रँक (आयएएस) मिळवून प्रेरणा कैलास खवळे हिने घवघवीत यश संपादन केले. प्रेरणा ही मालेगाव तालुक्यातील कळवाडी येथील मूळ रहिवासी आहे. तालुक्यातील लोणचारम येथे गावकऱ्यांसह विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या उपस्थितीत तिचा रविवार, दि. २२ मार्च रोजी भव्य नागरी सत्कार करण्यात आला. मातंग समाजातून केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश मिळविणारी खानदेशासह परिसरातील ती पहिलीच मुलगी ठरल्याने सर्वत्र अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

कार्यक्रमाच्या सुरूवातीला प्रेरणा खवळे यांची गावातून वाजतगाजत मिरवणूक काढण्यात आली. यावेळी गावकऱ्यांनी त्यांचे औक्षण करून जोरदार स्वागत केले. प्रेरणा ही लोणचारम येथील चुलतभाची असल्याने संपूर्ण गावात चैतन्याचे वातावरण होते. या सत्कार सोहळ्यास भाजप प्रदेश सरचिटणीस भैरवीताई वाघ-पलांडे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते प्रेरणा खवळे हिचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन यथोचित सन्मान करण्यात आला.

भैरवीताई वाघ-पलांडे म्हणाल्या, की प्रेरणाचे यश हे केवळ एका कुटुंबाचे नसून संपूर्ण समाजासाठी प्रेरणादायी आहे. तसेच सत्काराला उत्तर देताना प्रेरणा खवळे हिने आपल्या यशाचा प्रवास उलगडला. ती म्हणाली, की यशासाठी सातत्य, प्रचंड मेहनत आणि कुटुंबाकडून लाभणारे पाठबळ अतिशय आवश्यक असते. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी न्यूनगंड न बाळगता मोठी ध्येये ठेवून अभ्यास करावा. महेश पाटील आणि हरिश्चंद्र कढरे गुरुजी यांनी देखील मनोगत व्यक्त करून प्रेरणा यांच्या यशाचे कौतुक केले.

यावेळी विश्वास पाटील (लोण सीम), सौ. सीमा विवेक पाटील (सरपंच, लोणचारम), दीपक सुभाष पाटील (उपसरपंच, लोणचारम), विवेक पाटील (ग्रामपंचायत सदस्य, लोणचारम), दीपक अशोक पाटील, काशिनाथ पाटील, रवींद्र वैध्ये, सुरेश पाटील (माजी उपसरपंच, लोणचारम), वसंत पाटील, शालीक पाटील, चुडामण पाटील, मालोजी पाटील, पत्रकार सुरेश कांबळे, जितू कढरे, प्रवीण शिरसाठ, डॉ. राजू कांबळे, बाळासाहेब अवचिते, उमेश पाटील, भटू संजय पाटील, सचिन संजय पाटील, मदन खवळे, मंगल खवळे, पोलीसपाटील लोण खुर्द, लोणसीम, लोण बुद्रुक येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. संजय बाबूराव थोरात, ग्रामस्थ लोणचारम व समस्त मातंग समाजबांधवांनी कार्यक्रमाचे आयोजनासाठी परिश्रम घेतले. सरपंच प्रा. शशिकांत पाटील यांनी सूत्रसंचालन केले. मधुकर पाटील यांनी आभार मानले.




*अमळनेर : सन २०२५ मध्ये झालेल्या यूपीएससी परीक्षेत घवघवीत यश संपादन करणाऱ्या कळवाडी (ता. मालेगाव) येथील प्रेरणा कैलास खवळे हिचा तालुक्यातील लोणचारम येथे रविवारी नागरी सत्कार करताना भाजपच्या प्रदेश सरचिटणीस भैरवीताई वाघ-पलांडे. शेजारी लोणचारमचे सरपंच व मान्यवर.*

# कस्तुराबागनगरातून मोटारसायकल चोरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील मुंदडानगर-१ जवळील कस्तुराबागनगरातील रहिवासी शांताराम माणका महाजन यांची होंडा शाईन कंपनीची मोटारसायकल (एमएच १९-एवाय ६१६७) चोरीस गेल्याची घटना घडली आहे. रविवार, दि. २२ मार्च रोजी मध्यरात्रीनंतर ही घटना घडली.

शांताराम महाजन यांचे पुत्र प्रा. नितीन शांताराम चव्हाण यांनी पोलिसांत फिर्याद दिली. ही घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. हवालदार मिलिंद सोनार पुढील तपास करीत आहेत.






## गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...! जय स्वदेशी...!!

## संपादकीय



# पाणी बचत काळाची गरज

जागतिक जल दिन २२ मार्च रोजी सर्वत्र साजरा करण्यात आला. पाणी ही सजीवांची मूलभूत गरज आहे. पाण्याशिवाय कोणताही सजीव जगू शकत नाही. पाण्याची गरज नाही, असे कोणतेही क्षेत्र नाही. मात्र, आज जगभर पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली आहे. पूर्वी मुबलक स्वरूपात उपलब्ध असणाऱ्या पाण्याची आज मोठ्या प्रमाणात कमतरता जाणवत आहे. पाण्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. पाणी बचत ही काळाची गरज बनली आहे. यामुळेच पाण्याच्या बचतीसाठी जागरूकता निर्माण व्हावी याकरिता संयुक्त राष्ट्रसंघाने १९९२ मध्ये झालेल्या अधिवेशनात २२ मार्च हा दिवस जागतिक जल दिन म्हणून घोषित केला. त्यानंतर २२ मार्च १९९३ रोजी पहिल्यांदा जागतिक जल दिन साजरा करण्यात आला. ब्राझीलची राजधानी रियो डी जिनोरियो येथे पहिला जल दिन साजरा करण्यात आला. पाणी बचतीसाठी जगभरात जागरूकता निर्माण करणे हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे. २२ मार्च हाच दिवस जागतिक जल दिन म्हणून निवडण्यामागे कारणही तसेच आहे. २२ मार्चपासून वातावरण बदलाला सुरूवात होत असते. त्यामुळे तात्त्विकदृष्ट्या पावसाळ्याची सुरूवात होण्यासाठी हा दिवस कारणीभूत ठरतो. हा तर्क वापरून हा दिवस निवडण्यात आला आहे. पृथ्वीवर पाण्याचे पाण्याचे प्रमाण ७१ टक्के इतके असले, तरी पिण्यायोग्य पाणी अल्प प्रमाणात आहे.

वाढत्या लोकसंख्येची तहान भागविण्यास हे पाणी कमी पडत आहे. पाणी ही सजीवांची मूलभूत गरज असली, तरी इतर सजीव पाण्याचा अपव्यय करीत नाहीत. मानव मात्र पाण्याचा मोठ्या प्रमाणावर अपव्यय करतो, गरजेपेक्षा जास्त पाणी वापरतो. पाणी वापराचे नवनवीन मार्ग मानव शोधीत असतो. त्यामुळे पाण्याची तीव्रता जाणवते. हवामान बदलामुळे पावसाच्या पद्धतीत झपाट्याने बदल होत आहे. पूर्वी नियमित येणारा पाऊस आता बेभरवशाचा झाला असून, त्याच्यातील लहरीपणा मोठ्या प्रमाणात आता वाढीस लागला आहे. पावसाचे दिवस आणि पावसाचे प्रमाणही कमी होत चालले आहे. त्यामुळे दुष्काळाचे प्रमाणही वाढले आहे. जागोजागी बोअरवेल करून जमिनीखालील पाणीही मानवाने संपवले आहे. त्यामुळे भविष्यात पाणीटंचाईची समस्या आणखी गंभीर होणार आहे. त्यामुळेच कदाचित पाण्यासाठी तिसरे महायुद्ध होईल, असा अहवाल काही दिवसांपूर्वी संयुक्त राष्ट्रसंघाने दिला आहे. २०२५ पर्यंत जगातील एक तृतीयांश देशात पाणी पेटणार असल्याचे संकेत शास्त्रज्ञांनी दिले आहेत. आशिया खंडाबाबत सांगायचे झाले तर भारतात पाणीटंचाई मोठ्या प्रमाणात आहे. भारतात मार्चच्या सुरूवातीलाच पाणीटंचाईच्या झळा जाणवू लागतात. दरवर्षी ४० टक्के गावांत दुष्काळ असतो.

महाराष्ट्रातील मराठवाडासारख्या विभागात तर दरवर्षी दुष्काळ असतो. लातूरसारख्या शहराला रेल्वेने पाणीपुरवठा करावा लागतो. ग्रामीण भागात तर भीषण पाणीटंचाई जाणवते. अनेक गावांत टँकरने पाणीपुरवठा करावा लागतो. एकदा आलेला टँकर आठ दिवसांनीच पुन्हा येतो. काही गावांत तर एका महिन्यात एकदाच पाणी मिळते. हंडाभर पाण्यासाठी महिलांना कैक किलोमीटरची पायपीट करावी लागते. पाणी ही नैसर्गिक संपत्ती आहे. कृत्रिम पाणी तयार करण्यात अजूनही शास्त्रज्ञांना यश आलेले नाही म्हणूनच आहे त्या पाण्याची बचत करणे हेच आपल्या हातात आहे. पाण्याची बचत हीच पाण्याची निर्मिती आहे. पाण्याची बचत करूनच आपण पाणीटंचाईवर मात करू शकतो. जल है तो कल है... या उक्तीनुसार येणारा काळ सुखकर करायचा असेल, तर पाण्याची बचत करावीच लागेल. प्रत्येकाने पाणी बचतीचा संकल्प करून पाणी बचतीसाठी प्रयत्न केला तरच जागतिक जल दिनाचे सार्थक झाले, असे म्हणणे योग्य ठरेल.

# केंद्रीय मंत्री ना. नितीन गडकरींचे असेही सख्य!

## ज्याने भाजपचे तिकीट नाकारले, त्यालाच दिला भरभरून निधी; नेमके काय घडले?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



राज्याच्या राजकारणात माजी केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार व केंद्रीय मंत्री ना. नितीन गडकरी अशी ही या दोन नेत्यांची नावे याचा दाखला म्हणून दिली जात असतात. राजकारणात कधीही कोणी कायमचा शत्रू किंवा मित्र नसतो, असे सुभाषितवजा वाक्य प्रचलित झाले आहे. ते अयोग्य आहे असेही कोणी म्हणणार नाही. निकोप समाज जीवनाचे ते वैशिष्ट्य अशी पावती त्यास मिळते. असे मैत्र कोणाचे तर केंद्रीय मंत्री ना. नितीन गडकरी यांचा बहुपक्षीय संवाद कधीच लपून राहलेला नाही त्याचा हा दाखला. वर्ध्याचे खासदार अमर काळे हे कट्टर भाजपविरोधी राजकारण करणारे आहेत. आता ते विरोधी पक्षातील म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे. मात्र, मतदारसंघात कामे करायची तर सलोखा सर्वांशी असावा, अशी दृष्टी ठेवत भाजप मंत्र्यांशी भेटीगाठी घेतात. दोन जिल्ह्यास जोडणारा व ग्रामस्थ्यांची पायपीट थांबविणारा प्रकल्प प्रलंबित. हे काम ना. नितीन गडकरी हेच करू शकतात, हे भान खासदार काळे यांनी ठेवले.

### ना. गडकरी व काळे स्नेही कसे

रस्ते वाहतूक मंत्री असलेल्या ना. नितीन गडकरी यांच्याशी अमर काळे यांचे सौख्य कसे ? या प्रश्नाचे उत्तर इतिहासात आहे. २००४ मध्ये लागलेल्या विधानसभा निवडणुकीत आर्वी मतदारसंघ काँग्रेस गोटात वादात आला होता. तत्कालीन काँग्रेस प्रदेशाध्यक्ष प्रभा राव या आमदार अमर काळे यांची तिकीट कापणार, हे निश्चित मानले जात होते. शेवटच्या टप्प्यातही काँग्रेसतर्फे आर्वी मतदारसंघ उमेदवार घोषित झाला नव्हता. तेव्हा आता काही खरे नाही म्हणून चर्चा सूरू झाली. काळे - गडकरी भेट घडली. ना. गडकरी यांनी हमी दिली, की काँग्रेस जोवर तुझी तिकीट घोषित करीत नाही तोवर आर्वीत भाजप उमेदवार घोषित होणार नाही. काँग्रेस जर तुला तिकीट देत नसेल तर आम्ही देवू, तू ठरव, असा दिलासा ना. नितीन गडकरी यांनी अमर काळे यांना दिला. मात्र, याची कुणकुण लागताच अमर काळे हेच उमेदवार झाले. गडकरी यांनी असा शब्द दिला होता कां, या प्रश्नास खासदार काळे यांनी दुजोरा दिला.

### काळे म्हणतात, गडकरी मला...

केंद्रीय मंत्री ना. नितीन गडकरी यांनी वर्धा अमरावती जिह्यास जोडणारा एक वेगळा पूल मंजूर केला. हा आर्वीशी संबंधित. मात्र, त्यासाठी काळे- गडकरी दरबारी पोहचले. काम फत्ते करून गावी आले. हे काम ३० ते ४० गावातील लोकांना दिलासा देणारे ठरणार. सायखेडा ते गोकुळसरा मार्गावरील या पुलाने वर्धा अमरावती हे दोन जिल्हे थेट जोडले जातील. या परिसरातील हजारो नागरिकांना दोन्ही जिल्ह्यात ये- जा करणे अधिक सोयीचे ठरणार आहे. केंद्रीय रस्ते विकास निधीतून या साठी पैसे देण्याची हमी ना. नितीन गडकरी यांनी दिल्याचे खासदार काळे सांगतात. खासदार काळे यांची उपलब्धी

केंद्रीय मंत्री ना. नितीन गडकरी यांच्याकडे पाठपुरावा करीत हे काम मार्गी लागले. याबद्दल खासदार काळे यांची गोकुळसरा येथील गावकऱ्यांनी भेट घेत आभार मानले. ग्रामस्थ म्हणतात, की पिढ्यानंपिढया आम्ही वाहतूक अडचण भोगत आलो आहे. मात्र, ना. गडकरी यांनी शब्द दिल्याने काम मार्गी लागेल अशी खात्री आहे. तर खासदार काळे म्हणतात, की विकासकामात गडकरी हे पक्षातीत भूमिका घेत असल्याने हे शक्य झाले.


# लिलाव शेडवर कामावेळी मुनीमचा हृदयविकाराने मृत्यू

## अमळनेर बाजार समितीतील दुर्दैवी घटना; पाटील परिवारावर शोककळा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : येथील कृषी उत्पन्न बाजार समितीत कार्यरत असलेले मुनीम नितीन केशव पाटील (वय ५०, रा. ढेकू-अंबासन, ता. अमळनेर, जि. जळगाव) यांचा लिलाव शेडवर काम करतेवेळी हृदयविकारामुळे दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे ढेकू अंबासनसह अमळनेर बाजार समिती परिसरात शोककळा पसरली आहे. मिळालेल्या माहितीनुसार नितीन पाटील हे नेहमीप्रमाणे लिलाव शेडवर लिलाव प्रक्रिया पार पाडत होते. याचवेळी त्यांच्या छातीत तीव्र वेदना सुरू झाल्या. त्यांच्यामागे उभ्या असलेल्या शेतकऱ्यांच्या ही बाब लक्षात येताच त्यांनी तातडीने बाजूला असलेल्या व्यापाऱ्यांना याची माहिती दिली. व्यापाऱ्यांनी तातडीने त्यांना नर्मदा फाऊंडेशनच्या रुग्णालयात दाखल केले. मात्र, प्राथमिक तपासणीनंतर त्यांना अतिशय तीव्र हृदयविकाराचा झटका आल्याचे लक्षात आल्याने डॉ. शिंदे यांनी त्यांना ग्रामीण रुग्णालयात हलविण्याचा सल्ला दिला. मात्र, तेथे तपासणीअंती वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना मृत घोषित केले. नितीन पाटील हे अत्यंत मनमिळावू स्वभावाचे होते, अशी भावना त्यांच्या सहकारी मुनीमांनी व्यक्त केली. विशेष म्हणजे काही दिवसांपूर्वी म्हणजे १४ मार्च रोजी त्यांच्या मुलीचा लग्नसोहळा त्यांनी पार पाडला होता. त्यामुळे या घटनेने कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्यामागे पत्नी, मुलगा व मुलगी असा परिवार आहे.



# धनेश : दुर्मिळ, आकर्षक पक्षी

**ग्लोबल महातेज वृत्तसेव**

पक्ष्यांची ओळख

**नाव :** धनेश Hornbill
**रंग :** राखाडी. म्हणून या पक्षाला Grey hornbill म्हणतात
**चोच :** विशिष्ट चोचीमुळे धनेश पक्षी ओळखला जातो. चोच शिंगा सारखी ( Horn ) मजबूत असते. रंग पिवळा.
**डोळे:** नराचे लाल तर मादीचे पांढरे. डोळ्या भोवती काळे वर्तुळ
**घरटे :** धनेश मोठ्या जुन्या झाडांच्या ढोलीत घरटे तयार करतो. वृक्षतोड होत असल्यामुळे या दोन फूट लांब पक्षाची संख्या कमी होत आहे.
**अंडी :** मादी एप्रील मध्ये दोन तीन अंडी घालते. या काळात मादी दिड महिना घरट्यात स्वतःला बंद करून घेते. नर तिला फळं आणून खाऊ घालतो.
**भक्ष :** धनेश वड, पिंपळ, जांभूळ, उंबर झाडाची फळं खातो. त्याच बरोबर उंदीर, सरडे हे त्याचे भक्ष आहे.
**आवाज :** धनेश मोठ्याने व कर्कश ओरडतो. यांच्या थव्यातून कॉक कॉक आवाज ऐकू येतो.
**इतर वैशिष्ट्ये :** धनुष्यबाण चालावा तसा सरळ उडतो. धनेशची चोच डोक्यावर शिंगासारखी दिसते. धनेश दुर्मिळ पक्षी आहे. अमळनेरला धनेश मंगळ मंदिराच्या झाडीत, डुबकी जवळ, धुळे रोडवरील धान्य गोडाऊन जवळ दिसतो. बिज प्रसरणात धनेशची मदत मोलाची आहे.

**संग्राहक : प्रा. प्रकाश धर्माधिकारी**
**निसर्ग मित्र मंडळ,अमळनेर**

# वाळवण हंगामाला महागाईची झळ

## खाद्यतेल, साबूदाणा अन् डाळींमध्ये मोठी दरवाढ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : उन्हाची तीव्रता वाढताच गृहिणींची वाळवणासाठी लगबग सुरू होते. मात्र, यंदा या तयारीला महागाईची झळ लागलेली दिसून येत आहे. साबूदाणा, उडीदडाळ, नागली आणि विशेषतः खाद्यतेलाच्या दरात मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे गृहिणींचे बजेट कोलमडले आहे. सोयाबीनसह सूर्यफूल तेलाच्या दरातही लक्षणीय वाढ झाली आहे.

सोयाबीन तेलाचे ८०० ग्रॅमचे पॅकिंग १३० रुपयांवरून १५५ रुपयांवर, तर सूर्यफूल तेल १५० वरून १७० रुपयांपर्यंत पोहोचले आहेत. कच्च्या तेलाच्या वाढत्या किमती आणि जैव इंधनासाठी होणारा वापर यामुळे ही दरवाढ झाल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले. महाराष्ट्रात उन्हाळ्यात बटाटा-साबूदाणा चकल्या आणि पळी पापड्या आवर्जून केल्या जातात. मात्र, साबूदाण्याचे मुख्य उत्पादन केंद्र असलेल्या आंध्र प्रदेशातील श्रीशैल्यम येथे साबूदाण्याचा तुटवडा निर्माण झाल्याने अवघ्या १० दिवसांत साबूदाणा ६०-६२ रुपयांवरून ७० रुपये प्रतिकिलो झाला आहे. दरम्यान, व्यावसायिकांच्या मते ही दरवाढ आणखी एक ते दीड महिना कायम राहण्याची शक्यता आहे.

### युद्धामुळे वाढले तेलाचे दर

जागतिक युद्धजन्य परिस्थितीमुळे क्रूडऑईलचे दर वाढत आहेत. अनेक देशांत खाद्यतेलाचा वापर जैव इंधन बनविण्यासाठी केला जात असल्याने तुटवडा जाणवत आहे.

# पोलिसाच्या मुलाचा मिटवला वाद

## महिला अन्यायविरोधी समितीची यशस्वी मध्यस्थी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : अनेकदा इतरांचे प्रश्न सोडवणाऱ्या पोलीस यंत्रणेलाच स्वतःच्या घरातील प्रश्न सोडवताना अडचण येऊ शकते, याचे उदाहरण नुकतेच पाहायला मिळाले. स्वतः पोलीस अधिकारी असलेल्या पित्याने अखेर पोलिसिंगचा उपयोग होत नाही, आपणच काही करा, अशी विनंती करत अमळनेर महिला अन्याय विरोधी समितीकडे धाव घेतली आणि त्यांच्या मुलाचा चार वर्षांपासून सुरू असलेला कौटुंबिक वाद अवघ्या दोन आठवड्यांत मिटला.

पोलीस अधिकाऱ्याचा मुलगा श्रवण (नाव बदललेले) आणि त्याची पत्नी वैशाली यांच्यात गेल्या चार वर्षांपासून कौटुंबिक कारणांमुळे गंभीर बेबनाव निर्माण झाला होता. या प्रकरणात महिला दक्षता समिती, पोलीस ठाणे आणि न्यायालयातही तक्रारी दाखल झाल्या होत्या. त्यामुळे दोघांमध्ये पुन्हा सलोखा होण्याची शक्यता अत्यंत धूसर बनली होती.

पोलीस अधिकारी असलेल्या पित्याने व कुटुंबीयांनी अनेकदा समेट घडवून आणण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांना यश आले नाही. अखेर त्यांनी अमळनेर महिला अन्याय विरोधी समितीचे धनंजय सोनार यांच्याकडे मदत मागितली. समितीने या प्रकरणाचा बारकाईने अभ्यास करून पती- पत्नीमधील वादाचे मूळ कारण शोधले. त्यानंतर दोघांचे शास्त्रीय पद्धतीने समुपदेशन करण्यात आले. या समुपदेशनामुळे दोघांमध्ये संवाद पुन्हा सुरू झाला आणि अवघ्या दोन आठवड्यांत सलोखा निर्माण झाला. आज समाजातील पंच आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत दोघांचा वचननामा लिहून घेण्यात आला. त्यानंतर श्रवण आणि वैशाली यांनी नव्याने संसार सुरू करण्याचा निर्णय घेतला.

चार वर्षांपासून रखडलेले हे प्रकरण अल्पावधीत मार्गी लावल्याबद्दल शरद पाटील, गजानन सूर्यवंशी, अनिल पाटील, रजनीताई खुरसुंगे, केसरबाई पाटील तसेच संबंधित पोलीस अधिकाऱ्यांनी धनंजय सोनार व त्यांच्या सहकाऱ्यांचे आभार व्यक्त केले.

# पाचवी ते नववीची १० एप्रिलपासून वार्षिक परीक्षा

## विद्यार्थ्यांना २३ एप्रिलपासून लागणार उन्हाळी सुटी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : जळगाव जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ परीक्षा समितीतर्फे अनुदानित, विनाअनुदानित शाळांच्या वार्षिक परीक्षांचे अधिकृत वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. त्यानुसार इयत्ता पाचवी ते नववीपर्यंतची परीक्षा १० एप्रिलपासून सुरू होणार आहे. २२ एप्रिलपर्यंत परीक्षा सुरू राहणार असून, २३ एप्रिलपासून विद्यार्थ्यांना तर मे महिन्यात शाळेला उन्हाळी सुटी लागणार आहे. त्या अनुषंगाने शाळांकडून नियोजन केले जात आहे.

पायाभूत चाचणी थेट २२ एप्रिलपर्यंत असल्याने मुख्याध्यापक संघाने द्वितीय सत्रातील परीक्षा २२ एप्रिलपर्यंत ठेवल्या आहेत. एप्रिल महिन्यात उन्हाची तीव्रता अधिक असते. त्यामुळे ग्रामीण भागातील शाळांत पाण्याची समस्या जाणवते. दहावी-बारावीच्या परीक्षा लवकर संपतात, तर इतर वर्गांच्या परीक्षा लवकर घेऊन विद्यार्थ्यांना सुटी का दिली जात नाही? असा प्रश्न शिक्षक आणि शैक्षणिक संस्थांनी उपस्थित केला होता. एनसीईआरटीने मात्र तासिका पूर्ण होणे महत्त्वाचे असल्याचे नमूद केले आहे. त्यानुसार परीक्षा घेतल्या जाणार आहेत.

### 'पॅट' परीक्षांचा परिणाम


संकलित मूल्यमापन चाचणी अर्थात 'पॅट'च्या परीक्षेमुळे विद्यार्थ्यांच्या वार्षिक परीक्षा लांबल्या आहेत. शिक्षण विभागाने या विरोधावर आपली भूमिका स्पष्ट केली आहे. शाळांच्या शैक्षणिक वर्षासाठी ठरलेल्या तासिका पूर्ण होणे आवश्यक आहे. तसेच परीक्षेनंतर निकाल वेळेत लावण्याच्या सूचना एससीईआरटी यांच्याकडून दिल्या आहेत. त्यामुळे वेळापत्रकात कोणताही बदल करणे शक्य नसल्याचे मुख्याध्यापक संघाने जाहीर केले आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com




**जागतिक क्षयरोग दिन विशेष**

# जनजागृती आणि प्रतिबंध हाच लढ्याचा मंत्र




**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जगभरात २४ मार्च हा दिवस जागतिक क्षयरोग दिन म्हणून साजरा केला जातो. १८८२ मध्ये डॉ. रॉबर्ट कॉख यांनी क्षयरोगास कारणीभूत असणाऱ्या Mycobacterium tuberculosis या जिवाणूचा शोध लावला. या ऐतिहासिक शोधाच्या स्मरणार्थ हा दिवस पाळला जातो.

### क्षयरोग म्हणजे काय?

क्षयरोग (टीबी) हा एक संसर्गजन्य आजार असून तो प्रामुख्याने फुफ्फुसांवर परिणाम करतो. हा आजार हवेच्या माध्यमातून



पसरतो. टीबीग्रस्त व्यक्ती खोकताना, शिंकताना किंवा बोलताना जिवाणू हवेत सोडते आणि इतर व्यक्तींना संसर्ग होऊ शकतो.

### लक्षणे

- तीन आठवड्यांपेक्षा जास्त काळ खोकला
- वजन झपाट्याने कमी होणे
- रात्री घाम येणे
- ताप येणे
- छातीत दुखणे
- कधी-कधी रक्तमिश्रित खोकला

ही लक्षणे दिसल्यास त्वरित वैद्यकीय सल्ला घेणे अत्यंत आवश्यक आहे.

### उपचार आणि प्रतिबंध

क्षयरोग पूर्णपणे बरा होऊ शकतो. परंतु त्यासाठी नियमित आणि पूर्ण कालावधीपर्यंत औषधे घेणे गरजेचे आहे. सरकारकडून मोफत उपचार सुविधा उपलब्ध आहेत. DOTS (Directly Observed Treatment, Short-course) ही प्रभावी उपचार पद्धत आहे.

### प्रतिबंधासाठी उपाय

- वेळेवर लसीकरण (बीसीजी)
- पोषक आहार घेणे
- स्वच्छता आणि हवेशीर वातावरण राखणे
- संक्रमित व्यक्तीपासून सुरक्षित अंतर ठेवणे

### भारतातील स्थिती

भारत हा जगातील सर्वाधिक टीबी रुग्ण असलेला देश आहे. मात्र, सरकारच्या राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत २०२५ पर्यंत टीबीमुक्त भारत करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आलेले आहे. जनतेच्या सहभागाशिवाय हे उद्दिष्ट साध्य होऊ शकत नाही.

### समाजाची भूमिका

- टीबी रुग्णांबद्दल भेदभाव टाळा
- योग्य माहितीचा प्रसार करा
- लक्षणे दिसल्यास तपासणीस प्रोत्साहन द्या
- उपचार पूर्ण करण्यासाठी रुग्णांना साथ द्या

जागतिक क्षयरोग दिन हा केवळ एक दिवस नसून, तो समाजातील प्रत्येक घटकाला एकत्र येऊन या आजाराविरुद्ध लढा देण्याची प्रेरणा देतो. 'होय! आपण टीबीचा अंत करू शकतो!' हा संदेश प्रत्येकापर्यंत पोहोचविणे हीच आजच्या दिवसाची खरी गरज आहे.

# जगातील सर्वांत सुंदर आणि श्रीमंत महिला कोण?

## ज्यांची संपत्ती छोट्या देशाच्या अर्थव्यवस्थेला देते टक्कर, ४ नंबरवर भारतीय अभिनेत्री प्रियंका चोप्रा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जगातील सर्वांत सुंदर आणि श्रीमंत महिला. ज्यांची संपत्ती एखाद्या छोट्या देशाच्या अर्थव्यवस्थेला देऊ शकते टक्कर. चौथ्या नंबरवर आहे बॉलिवूड अभिनेत्रीचे नाव. हॉलीवूडपासून ते बॉलिवूडपर्यंतच्या अभिनेत्री त्यांच्या सौंदर्याने आणि स्टाईलने चाहत्यांच्या मनावर राज्य करतात. मात्र, या ग्लॅमरच्या दुनियेतील अनेक अभिनेत्री केवळ अभिनयापुरत्याच मर्यादित नसून त्यांनी आपल्या हुशारी, ब्रँडिंग आणि व्यवसायिक दृष्टिकोनाच्या जोरावर प्रचंड संपत्ती उभी केली आहे. त्यांच्या कमाईचे आकडे इतके मोठे आहेत, की ते एखाद्या छोट्या देशाच्या अर्थव्यवस्थेलाही टक्कर देऊ शकतात. विशेष म्हणजे जगातील सर्वाधिक श्रीमंत आणि प्रभावशाली अभिनेत्रींच्या यादीत बॉलिवूडमधीलही एका अभिनेत्रीने स्थान मिळविले आहे.

या यादीत पहिल्या



क्रमांकावर जागतिक स्तरावर प्रसिद्ध असलेली गायिका आणि अभिनेत्री रिहानाचे नाव आहे. ती जगातील सर्वांत श्रीमंत महिला कलाकारांपैकी एक बनली आहे. तिची एकूण संपत्ती सुमारे १.४ बिलियन डॉलर्स (सुमारे ११ हजार ६२० कोटी रुपये) इतकी आहे.

दुसऱ्या क्रमांकावर ९० च्या दशकात हॉलिवूडमध्ये मोठे नाव कमावलेली अभिनेत्री अँजेलिना जोली आहे. उत्कृष्ट अभिनयासोबतच ती एक यशस्वी दिग्दर्शकही आहे. अँजेलिनाची एकूण संपत्ती सुमारे १२० मिलियन डॉलर्स (९९६ कोटी रुपये) आहे. तिसऱ्या स्थानावर हॉलिवूडमधील सुंदर आणि प्रतिभावान अभिनेत्री हॅले बेरी हिचा समावेश आहे. 'Catwoman' या चित्रपटातून तिला मोठी ओळख मिळाली. ती एका चित्रपटासाठी तब्बल शंभर कोटी रुपयांपर्यंत मानधन घेते. तिची एकूण संपत्ती सुमारे ९० मिलियन डॉलर्स (७४७ कोटी रुपये) आहे.

या यादीत चौथ्या क्रमांकावर बॉलिवूडची 'ग्लोबल स्टार' म्हणून ओळखली जाणारी प्रियंका चोप्रा हिचे नाव आहे. अभिनयासोबतच प्रॉडक्शन आणि आंतरराष्ट्रीय प्रोजेक्ट्समुळे तिची संपत्ती सुमारे ७० मिलियन डॉलर्स (५८१ कोटी रुपये) इतकी आहे.

# पित्याचे स्वप्न केले साकार!

## पहिले बनली आयपीएस मग आयएएस बनून बजावतेय महत्त्वपूर्ण भूमिका

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मुद्रा गैरोला हिने अपयशावर मात करत पित्याचे यूपीएससीचे स्वप्न साकार केले. दहावीला ९६ टक्के, बारावीला ९७ टक्के गुण मिळवत तिने अभ्यासात सातत्य राखले. प्रत्येकाचे काहीना काही स्वप्न असते कुणाला डॉक्टर बनायचे असते, तर कुणाला अभियंता. कुणाला आणखीन काही दुसरे. पण त्यातील काही असे असतात, की ज्यांना स्पर्धा परीक्षा पार करायची असते. देशसेवेचे वेड त्यांना इतक्या कठीण परीक्षांना सहज पार करण्याचे बळ देते. अशीच काहीशी कथा मुद्रा गैरोला हिची आहे.

मुद्राचे वडील पाच दशकांपूर्वी स्पर्धा परीक्षांची तयारी करत होते. तोच वारसा पोरीकडे आला. पण पोरीने फक्त प्रयत्न केले नाहीत, तर पित्याचे स्वप्न पूर्णही केले. मुद्रा एका छोट्या गावखेड्यातून येते. अभ्यासात इतकी हुशार की दहावीला पोरीने ९६ टक्के गुण मिळविले. पुढे बारावीलाही तशीच अभ्यासाची चिकाटी ठेवून ९७ टक्के गुण मिळविले. त्यांनतर पुढच्या शिक्षणासाठी मुद्रा महाराष्ट्रात आली. येथे तिने डेंटलमध्ये गोल्ड मेडल मिळविले.

मुद्राला तिच्या पित्याच्या स्वप्नाबाबत माहीत होते. त्यासाठी तिने डेंटलचा अभ्यास अर्ध्यातच सोडला.




तिने यूपीएससीची तयारी सुरू केली. तिने एकदा नाही अनेकदा परीक्षा दिली. कधी मेन्समध्ये नापास तर कधी मुलाखतीतून बाहेर. पण तिने जिद्द सोडली नाही. अखेर २०२१ मध्ये १६५ रँकसह तिने यूपीएससी पार केली. पण तिला आयएएस व्हायचे होते. त्यामुळे तिने पुन्हा प्रयत्न केले आणि २०२२ मध्ये पुन्हा प्रयत्न करून आयपीएस मुद्रा आयएएस झाली.

मुद्रांच्या वडिलांनी १९७५ मध्ये यूपीएससीची परीक्षा दिली होती. पण त्याकाळी त्यांनी मेन्स तर पार केली. पण मुलाखतीतून ते बाहेर आले. त्यामुळे त्यांची अशी इच्छा होती, की त्यांच्या मुलाने ते अर्धवट राहिलेले काम पूर्ण करावे. जेणेकरून मुलांकडून का होईना पण त्यांना ती गोष्ट पूर्ण करण्याचा आनंद मिळेल. त्यामुळे मुद्राने अहोरात्र कष्ट घेऊन आपल्या वडिलांचे स्वप्न पूर्ण केले. वाटेत अनेक गोष्टी आल्या, पण त्यांना बाजूला सारून पुन्हा उभे राहून पित्याचे स्वप्न साकार केले.



# शर्टमधील पहिले बटण नेहमी आडवे का असते? आजवर कोणीही सांगितले नसेल हे सिक्रेट

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आपण दररोज शर्ट घालतो. पण कधी विचार केला आहे का की शर्टची सर्व बटणे ही उभी असतात. पण कॉलरजवळ असलेले सर्वांत वरचे पहिले बटण हे मात्र नेहमी आडवे का असते? नाही ना. चला, आज आपण जाणून घेऊया. शर्टची सर्व बटणे हे डिझाईन किंवा फॅशनसाठी नसून त्यामागे एक महत्त्वाचे तांत्रिक कारण असते. शर्टच्या या रचनेमुळे बटण तुटण्यापासून वाचते आणि दिवसभर कॉलरची फिटिंग व्यवस्थित राहण्यास मदत होते. शर्टच्या कॉलरजवळ असलेल्या बटणावर शरीराच्या हालचालींमुळे सर्वाधिक ताण येतो. जेव्हा आपण मान हलवतो किंवा जेवताना गळा वर करतो, तेव्हा हे बटण ओढले जाते. जर हे बटण उभे असते, तर ताणामुळे ते लवकर तुटण्याची किंवा काजातून निसटण्याची शक्यता जास्त असते. आडवे काज या ताणाला अधिक चांगल्याप्रकारे सहन करू शकते. त्यामुळे बटण आपल्या जागी घट्ट टिकून राहते. जेव्हा कपड्यावर दाब येतो तेव्हा उभ्या काजांमधून बटण सहज सरकू शकते. मात्र, आडव्या काजामध्ये बटण काजाच्या अगदी टोकाला जाऊन अडकते. ज्यामुळे शर्ट आपोआप उघडण्याची भीती राहत नाही. शर्टच्या खालच्या बटणांवर इतका ताण येत नसल्यामुळे ती उभी ठेवली जातात, जेणेकरून शर्ट घालताना आणि काढताना सोपे जावे. कॉलरचे बटण व्यवस्थित बसणे शर्टच्या संपूर्ण फिटिंगसाठी महत्त्वाचे असते. आडवे बटण शर्टला मानेजवळ व्यवस्थित लॉक करते. यामुळे कॉलरचा आकार बिघडत नाही आणि शर्ट प्रोफेशनल दिसतो. अनेक ब्रँडेड शर्ट्समध्ये सर्वात खालचे बटण देखील आडवे असते. याचे कारण म्हणजे जेव्हा आपण बसतो तेव्हा पोटापाशी शर्टवर ताण येतो. हे आडवे बटण तो ताण सहन करून शर्ट फाटण्यापासून किंवा बटण निघण्यापासून वाचवते.



# महाराष्ट्र में बिक गई दाऊद इब्राहिम की पैतृक जमीन

## जानें कौन है खरीदार ८ साल के लंबे इंतजार और चार बार की नाकाम कोशिशों के बाद

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आखिरकार महाराष्ट्र के रत्नागिरी में दाऊद इब्राहिम की पैतृक जमीन की नीलामी सफल रही। अंडरवर्ल्ड के खौफ को पीछे छोड़ते हुए मुंबई के एक खरीदार ने इस पुश्तैनी संपत्ति को अपने नाम कर लिया।



भारत के मोस्ट वांटेड अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिम की महाराष्ट्र के रत्नागिरी जिले में स्थित चार पैतृक कृषि संपत्तियों को आखिरकार नया खरीदार मिल गया है। एक नीलामी में मुंबई के एक शख्स ने सभी चार प्लॉट के लिए सबसे ऊंची बोली लगाकर इन्हें अपने नाम कर लिया है। यह नीलामी 'तस्कर और विदेशी मुद्रा जोड़-तोड़ अधिनियम' यानी SAFEMA (Smugglers and Foreign Exchange Manipulators Act) के तहत की गई थी। अधिकारियों के अनुसार, लंबे समय से इन संपत्तियों को बेचने की प्रक्रिया चल रही थी, जिसे अब सफलतापूर्वक पूरा कर लिया गया है। ये चारों कृषि भूखंड रत्नागिरी जिले के खेड तालुका के मुंबके गांव में स्थित हैं। मुंबके दाऊद इब्राहिम का पैतृक गांव माना जाता है। रिपोर्ट्स के मुताबिक, इनमें से कई प्लॉट मूल रूप से दाऊद की मां, अमीना बी के नाम पर दर्ज थे।

डॉन की संपत्तियों को खरीदने के लिए पहले लोग डर के कारण सामने नहीं आते थे, लेकिन इस बार मुंबई के एक निवेशक ने साहस दिखाते हुए सभी चार प्लॉटों पर कब्जा जमाया है। यह नीलामी न केवल आर्थिक रूप से महत्वपूर्ण है, बल्कि यह अपराधियों के मन में कानून के डर और सरकार की कड़क कार्रवाई का एक बड़ा संदेश भी है।

पहले भी कई बार हुई थी जमीन को बेचने की कोशिश

प्रशासन ने इससे पहले २०१७, २०२०,२०२४ और २०२५ में भी इन संपत्तियों को बेचने की कोशिश की थी, लेकिन हर बार विफलता हाथ लगी। नवंबर २०२५ में तो सरकार ने रिजर्व प्राइस (न्यूनतम कीमत) में ३० प्रतिशत की भारी कटौती भी की थी, फिर भी कोई खरीदार डर के मारे आगे नहीं आया। सूत्रों के अनुसार, इन संपत्तियों के साथ दाऊद और 'डी-कंपनी' का नाम जुड़ा होना ही निवेशकों के पीछे हटने की मुख्य वजह थी, क्योंकि लोग अंडरवर्ल्ड के साथ किसी भी तरह के विवाद या सुरक्षा जोखिम से बचना चाहते थे।

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम

सीमा हॅण्डलूम हाऊस पारोळा रोड, धुळे




# श्रीराम-सीता मातेचे खूप वेगळे चित्र!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हजारो वर्षे रामायणात रंगून गेलेल्या या देशात आजवर श्रीरामांच्या चरित्रासंबंधी लाखो कलाकृती निर्माण झाल्या आहेत. अभिजात कलावंतांपासून ते लोककलावंतांपर्यंत. राजवाड्यांपासून शबरीच्या पर्णकुटीपर्यंत या कलाकृती आढळतात. चित्रे, मूर्ती, शिल्पे, लेखन, काव्य, नाटके, संगीतिका, गीते, महाकाव्ये, चित्रपट अशा शेकडो माध्यमांतून आपल्यापर्यंत श्रीरामांची कथा पोहोचते. येणाऱ्या श्रीराम नवमीच्या निमित्ताने एक अतिशय वेगळे चित्र आपल्यासमोर सादर करीत आहोत.

हे चित्र फार वेगळे आणि रंजक आहे. या चित्रामध्ये सीता मातेने मराठी पद्धतीची साडी नेसून पदर खोचलेला आहे. त्यांच्या नाकात नथ, गोल अंबाडा आणि त्यावर मोत्यांची वेणी, कानात झुंबर, हातात तोडे, वाकी असून तिघांच्याही वस्त्राचे सोगे / ओचे समोर सोडलेले आहेत. प्रभू श्रीरामचंद्रांच्या अंगावर राजवस्त्रे असून तो कोदंडधारी आहे. लक्ष्मणाच्या अंगावर उपरणे असले तरी पूर्ण उत्तरीय वस्त्र नाही. तो उघडा आहे. त्यांनीही धनुष्य धारण केले आहे. पाठीवर असलेल्या बाणांच्या भात्याचा पट्टा हा प्रथमच इतका तपशीलवार पाहायला मिळतो आहे. सकृतदर्शनी मराठी वाटावीत अशी वस्त्रप्रावरणे व दागिने आहेत. या मूर्तींचे चेहरे नाजूक, सुंदर आहेत.

सर्वांत वेगळेपणा म्हणजे सीता मातेने शालीनतेने श्रीरामांचा डावा हात धरला आहे. धार्मिक विधी करीत असतानाची काही चित्रे सोडली तर मर्यादापुरुषोत्तम श्रीरामांच्या संबंधित हे दृश्य फारसे पाहायला मिळत नाही . हे चित्र खूपच जुने असून ते त्या काळात लाहोर येथे न्यायाधीश म्हणून कार्यरत असलेल्या आयसीएस भिडे यांच्या घरातील आहे. त्यांचे नातू श्री. श्रीनिवास माटे ( वय ८६ आणि आता अमेरिकेत वास्तव्य ) यांच्या संग्रहातील हे दुर्मिळ चित्र सध्या अत्यंत खराब झाले आहे. तथापि कृत्रिम बुद्धिमत्ता वापरून मी ते पुनर्जीवित केले आहे. येत्या श्रीराम नवमीच्या निमित्ताने श्रीराम सीता आणि लक्ष्मणाचे हे एक वेगळे दर्शन!

**अयोध्येमध्ये पुन्हा दिमाखात अवतरलेल्या या प्रभू श्रीरामचंद्रांना 'भूयो भूयो नमाम्यहं'!**



# शूर सेनापती श्री मंगळग्रह

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मंगळ सध्या कुंभमध्ये गोचर करत आहेत. मंगळ ताकद आणि ॲग्रेशनचा प्रमुख कारक ग्रह आहे. मंगळ अग्नितत्त्वाचा ग्रह आहे. अग्नीपासूनच हे जग चालले आहे. कल्पना करा की जगातील सर्व फॅक्टरींमधून अग्नी बाजूला केला तर कुठले प्रॉडक्शन तयार होईल का? ते सोडाच अग्नीशिवाय आपण साधे जेवणही बनवू शकत नाही. आधी मानवाचा सर्वांत प्रथम शोधही अग्नीच होता. आणि ते पचविण्यासाठी सुद्धा ऊर्जा लागतेच.



### मंगळग्रहापासून होणारा रुचक महापुरुष योग

ऊर्जा, शक्ती, साहस, हिंमत, गती आणि कर्माचे ग्रह आहेत मंगळ. मंगळाच्या उत्तम स्थितीशिवाय कोणीही व्यक्ती डॉक्टर, इंजिनिअर, आर्मीऑफिसर, मॅनेजर, खेळाडू होत नाही. हाच मंगळ जेव्हा कुंडलीत आपल्या स्वराशीत, उच्च राशीत कुंडलीमध्ये केंद्रस्थानी असेल तर रुचक नामक महापुरुष योग होतो. मंगळ जेव्हा कुंडलीत सुस्थितीत असतो, रुचक योग बनवतो तेव्हा व्यक्तीला अतिशय पुढे घेऊन जातो. पण जेव्हा मंगळ दूषित होतो तेव्हा रक्त विषयक आजारपण, अपघातही देऊ शकतो.

मंगळ प्रभावित जातकांचे डोळे लालसर आणि नजर भेदक पाहायला मिळते, चाल वाघाप्रमाणे, मजबूत मंगळ असलेला व्यक्ती नुसता समोरून जरी गेला तरी त्याचा प्रभाव चटकन लक्षात येतो. मंगळ इच्छाशक्तीचा कारक आहे, शरीरात रक्ताचा कारक, शरीराच्या गर्मीने रक्त जलद प्रवाहीत होत असते, तीच गर्मी आणि प्रवाह मंगळ आहे, मंगळ जेव्हा कुंडलीत शुभ असतो तेव्हा व्यक्तीला खूप मेहनती बनवितो, म्हणून मैदानी खेळांमध्ये मंगळाचा अधिकार आहे, हाच मंगळ कार्याने देशासाठी प्राणाची आहुती देण्याची जिद्द देतो. मंगळ ग्रहांचा सेनापती आहे, म्हणून उत्तम स्थितीत असलेला मंगळ जातक आर्मी, पोलिसमध्ये कार्यरत होतात. क्रांतिकार व्यक्तींचे मंगळ उत्तम स्थितीत पाहायला मिळतात, मंगळ प्रभावित व्यक्ती स्टेटफॉर्वड असतात. आपल्या मित्रासाठी जीवलग मित्र असतात, जीवाची पर्वा करत नाही.

### रुचक योग कसा बनतो?

मंगळ जेव्हा कुंडलीत केंद्र स्थानात म्हणजे प्रथम, चतुर्थ, सप्तम आणि दशम या स्थानात जेव्हा स्वराशीत मेष, वृच्छिक किंवा आपल्या उच्च राशीत मकरमध्ये स्थित असतो तेव्हा रुचक महापुरुष योग बनतो. रुचक योगाचे नैसर्गिक फळ काय असते, असे जातक स्फूर्तिवान, मजबूत शरीरयष्टीचे असतात. शांतपणे बसून राहणे यांच्या स्वभावत नसते, दया करणे आणि दंड देणे यांना सारखेच असते, रुचक योग व्यक्ती अशा कार्यक्षेत्रात सफल होतात जेथे अतिसंघर्षाचे काम असते, जेथे शार्फऑब्जेक्ट चे काम असते मग डॉक्टर, इंजिनिअर, सर्जन, आर्मी, पोलीस, प्रत्येक सिक्युरिटी सिस्टीम, फॅक्टरी ऑनर्स, फायर्बिग्रेट, ॲडमिनिस्टेटर, रुचक योगवाले जातक उत्तम आणि सफल मॅनेजर होतात. कुंडलीच्या वेगवेगळ्या केंद्र स्थानात रुचक योगाचे फल वेग-वेगळे बनते, प्रथम स्थानात रुचक योग असणारे जातक रिस्क टेकर बनतात, असे जातक घाईगडबडीत राहतात, पण धीरिष्ट आणि निच्छयी असतात.

- चथुर्त स्थानी रुचकयोग जातक अशा क्षेत्रात टॉपवर असतात जेथे त्यांना घरापासून दूर राहावे लागते, जसे आर्मी. - सप्तम स्थानी रुचकयोग जातक मोठ-मोठ्या कंपनीचे मालक असतात, रात्रंदिवस कामात व्यस्त असतात.
- दशम स्थानी रुचक योग किंवा येथे मंगळ सर्वात उत्तम मानला आहे, कारण येथे मंगळाला द्विगबल प्राप्त होते, येथे मंगळ कुलदीपक योग बनवतो, वैवाहिक जीवांनासाठी हा मंगळ मांगळीक दोष बनवत नाही.
- या योगाचे नाव रुचक का आहे? रुचक हे नाव रुचि या शब्दा पासून बनला आहे, म्हणजे इच्छा. रुचकयोग चे जातक ज्या कामात त्यांची इच्छा असते ती कामे उत्तम प्रकारे करतात. म्हणजे असे जातक हाती घेतलेले काम पूर्णच करतात अर्धवट सोडत नाही, म्हणूनच मंगळाला सेनापती म्हटले आहे, युद्धात शेवट पर्यन्त उभा राहतो, सर्वात प्रथम जातो आणि शेवट पर्यंत राहतो.

### कुंडलीत रुचक फळ पाहताना कसे पाहाल?

कल्पना करा, की आपल्याजवळ चार रुचक योगाच्या कुंडल्या आल्या आहेत. तर चारही जातकांना रुचक योगाचे समान फळ सांगाल का? नाही, तर आपणास कोणकोणत्या गोष्टींवर लक्ष द्यावे लागेल?

१) जेव्हा कुंडलीत रुचक योग बनत असेल किंवा इतर कूठचाही योग बनत असेल तर, लग्नेश, सूर्य आणि चंद्र बल पहाणे अत्यावशक असते, यांच्याच बळावर कोणताही राजयोग सफल होत असतो.

२) कुंडलीत जेव्हा रुचक योग बनत असेल तर मंगळाचे अंश बल पण नक्कीच पहावे, मंगळ १० अंश पासून २० अंशामध्ये असणे अत्यंत आव्श्क आहे नाहीतर या रुचक योगाचे पूर्णता फळ प्राप्त होत नाही. जर मंगळ ०२ अंशात किंवा २८-३० अंशात असेल तर हा मंगळ फक्त दिखावा बनतो, अशा स्थितीत मंगळ संबंधित उपाय आवश करावे ज्याने या योगाची रेंज वाढेल.

३) ज्या कुंडलीत रुचक योग आहे त्या कुंडलीत मंगळ कारक ग्रह आहे की अकारक आहे, म्हणजे जर कुठल्याही अशुभ भावाचा स्वामी होत असेल तर अशा वेळी हा रुचक योग जीवनात समस्या वाढवू शकतो, खूप संघर्ष करेल.

४) मंगळ रुचक योग स्थितीत वक्री अवस्थेत असु नहे, ग्रहांची वक्री स्थिति पेंडिंग कर्म दर्शवते आणि कॉम्म्पलीकेशन वाढवतात अशा स्थितीत फलादेश विचारपूर्वक करावा.

५) वर्ग कुंडलीतील पण मंगळ स्थिती अवश्य विचारात घ्या. जेवढ्या जास्त वर्ग कुंडलीत मंगळ चांगल्या भावात असेल तेवढाच चांगला प्रभाव रुचक योगाचा मिळेल. खास करून नवमांश आणि दशमांश कुंडलीत मंगळाची स्थिति नक्कीच पहावी.

### रुचक योग केव्हा भंग होतो?

१) जर रुचक योगात मंगळ, रवी बरोबर असेल तर हा योग भंग होतो.
२) जर रवीमुळे मंगळ अस्त होत असेल.
३) कूटच्या इतर ग्रहाबरोबर ०१ अंशाच्या आत असेल तर ही ग्रह युद्धस्थिती निर्माण होते आणि यात मंगळ कमजोर झाल्यास हा योग भंग होतो.

### रुचक योगाचे फळ जीवनात केव्हा मिळेल?

ज्यांच्या कुंडलीत रुचक योग आहे त्यांना या योगाचे फळ तर जीवन भर प्राप्त होईल. पण जेव्हा-जेव्हा मंगळ महादशा येईल, अंतर्दशा येईल किंवा गोचरीने मंगळ चंद्र राशी, लग्न, केंद्र भाव किंवा त्रिकोण भावातून गोचर करेल तेव्हा रुचक योगाचे फळ प्राप्त होत राहील.

### रुचक योग जर कमजोर असेल तर उपाय काय कराल?

१) येथे आपण मंगळाच्या प्रवाळ रत्नाचा वापर करून रेंज वाढवु शकता, पण हे सुद्धा एक जहाल रत्न आहे, उत्तम ज्योतिषी मार्गदर्शकाचा सल्ला घ्यावा आणि वापरावा अन्यथा विपरीत परिणाम होऊ शकतो, रक्त दाबाची जर समस्या असेल तर हे रत्न वापरू नहे. हे रत्न जास्त काळ किंवा वर्षान- वर्ष वापरू नहे. अति जास्त रतीचा वापरू नहे.

२) श्री गणेशांची उपासना करावी, मंगळवारी हनुमंतांची पुजा-अर्चना करावी, तेल आणि शेंदूरांनी अभिषेक करावा.

# प्रभु श्रीराम को १४ वर्ष का ही वनवास क्यों?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हम सभी जानते हैं कि माता कैकेयी ने श्रीराम के लिए वनवास मांगा था, लेकिन यह १४ वर्ष का ही क्यों था? १३ या १५ वर्ष क्यों नहीं? इसके पीछे कई गहरे पौराणिक, दार्शनिक और आध्यात्मिक रहस्य छिपे हैं: १४ इन्द्रियों और वृत्तियों की शुद्धि : आध्यात्मिक दृष्टि से, मनुष्य के भीतर १४ वृत्तियां होती हैं (५ कर्मेन्द्रियां, ५ ज्ञानेन्द्रियां, मन, बुद्धि, चित्त और अहंकार)। १४ वर्ष का वनवास यह दर्शाता है कि जब तक मनुष्य अपनी इन १४ वृत्तियों को एकांत और तपस्या से शुद्ध नहीं करता, तब तक वह अपने भीतर के अहंकार (रावण) को नहीं मिटा सकता। रावण की शेष आयु का रहस्य : देवलोक की योजना के अनुसार, रावण की आयु में केवल १४ वर्ष ही शेष थे। माता कैकेयी तो केवल एक माध्यम बनीं, जिनकी मति स्वयं माँ सरस्वती ने फेरी थी। यह योजना स्वयं भगवान की थी ताकि आतातायी रावण का अंत उसके समय के पूर्ण होने पर किया जा सके।


अवध के राजा से विश्व के सम्राट तक की यात्राः माता कैकेयी श्रीराम को केवल अयोध्या (अवध) की सीमाओं में बंधा हुआ राजा नहीं, बल्कि पूरे विश्व और सभी प्राणियों के हृदय का सम्राट बनाना चाहती थीं। श्रीराम का पावन यश चौदहों भुवनों में फैले, यह बिना तप और रावण वध के संभव नहीं था।

ताड़का का अधूरा वरदानः कम्ब रामायण और कुछ अन्य कथाओं के प्रसंगों के अनुसार, ताड़का ने एक बार भूलवश राजा दशरथ की सहायता की थी और वरदान में १४ वर्ष के लिए अयोध्या की राजगद्दी मांगी थी। जब श्रीराम ने ताड़का का वध किया, तो रघुकुल की 'प्राण जाए पर वचन न जाए' की कीर्ति बचाने के लिए भगवान राम ने वनवास स्वीकार किया और ताड़का की इच्छा का मान रखा।

जीवन का असली सार : रामायण में अयोध्या हमारे शरीर का प्रतीक है जो सरयू (शांत मन) के पास है। रावण घमंड है, कुंभकर्ण अहंकार, और शूर्पनखा काम का प्रतीक है। वनवास की यह दिव्य लीला हमें सिखाती है कि वासना, लालच और क्रोध को त्यागकर ही हम सच्ची शांति (सीता माता) और ईश्वर (श्रीराम) को प्राप्त कर सकते हैं।



# दान एक संस्कार



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आपल्याला काही मौल्यवान प्राप्त करायचे असेल तर आधी काहीतरी यावे लागेल, कशाचा तरी त्याग करावा लागेल. 'दान'चा पर्यायी शब्द त्याग आहे. आपल्या देशात दान करणे, हा संस्कार मानला जातो. पौराणिक काळापासून दानाचे अनन्यसाधारण महत्त्व आपल्या मनावर बिंबविले गेले आहे. हिंदू संस्कृतीशी या संस्काराची नाळ घट्ट जुळलेली आहे.

पौराणिक काळामधे दधिची ऋषींच्या अस्थित्यागामुळे, देवलोकाला वृत्रासूरासारख्या बलाढ्य असूराचा नाश संहार करण्यासाठी वज्रायुध नावाचे अस्त्र प्राप्त होऊन देवांचा विजय झाला. महाभारतातील कर्णाने केलेले कवचकुंडलांचे दान, ज्यांच्यामुळे तो अजेय ठरला होता, त्याचे तसे करणे हे साक्षात मृत्यूला आमंत्रण होते. स्वार्थाच्या पलीकडे जाऊन लोककल्याणासाठी सर्वस्वाचे दान करणे ही आपली परंपरा आहे. देशासाठी हौतात्म्य स्वीकारलेले देशभक्त, सीमेवर लढणारे सैनिक यांनी प्राणाचे बलिदान देऊन मातृभूमीला दास्यमुक्त करून जनतेला सुरक्षिततेचा आश्वास दिला. आजही त्याच अनुभवातून देश जातो आहे. इतिहासकालावर दृष्टिक्षेप टाकताना, शिवरायासारखे गुरू योद्धे यांनी केलेल्या लढाया रामदास स्वामींसारखे अनेक संतमहात्मे यांनी केलेली जनजागृती ही केवळ धर्मसंस्थापनार्थाय होती. हिंदू धर्माला प्रतिष्ठापना मिळवून देण्यासाठीचा हा लढा होता. हिंदू धर्माची व्याप्ती 'मानवताधर्मा'पर्यंत व्यापक होती. ही सर्व अलौकिक त्यागाची उदाहरणे आहेत. असे म्हणतात, की गरुडाची आकाशात सर्वोच्च भरारी असली तरी बगळा (तेवढा उंच जाऊ शकत नाही) आपले उडणे सोडत नाही. याचा अर्थ प्रत्येकाने आपल्या क्षमता ओळखून कार्य करायलाच हवे. आपल्या आवाक्यातील दान, त्याग, परोपकार हा आपण करूच शकतो. आपल्याकडे पूर्वी गोग्रास काढणे, खंडोबा (कुत्रा)साठी नैवेद्य काढणे, माधुकरी मागायला येणाऱ्या व्यक्तीला पूर्ण ताजे अन्न देणे, वार लावून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांचा वार ठरवून त्या दिवशी पोटभर जेवू घालणे असे पुण्यकृत्य प्रत्येक कुटुंबात गृहिणीकडून होत असे. आज कालसुसंगत असे बदल करत आपणही ही दानाची परंपरा सुरू ठेवू शकतो.

**दातव्यं इति यत् दानं, दीयते अनुपकारिणे।**
**देहो कालेच पत्रिच, तत दानं सात्विकं स्मृतं ।**

याचा अर्थ दान देणे हे कर्तव्य आहे या भावनेतून, कोणत्याही फळाची आशा न करता योग्यवेळी योग्यस्थानी योग्य व्यक्तीला केलेले दान ते सात्विक असते (जे आपणा सर्वांना करणे शक्य आहे.) हे करत असताना LONE WO CAN DO SO LITTLE, TO GATHER WE CAN DO SO MUCH. हे जर प्रत्येकाने लक्षात घेऊन दानाचा समावेश सर्वांनी आचारसंहितेमध्ये केला तर अशांचा समूह, पक्ष, संघटना यांचे ध्येय, धोरण स्वीकारलेली जबाबदारी समाजामधे मोठ्या प्रमाणात सकारात्मक बदल घडवू शकतात. असे कुणाच्या तरी आयुष्यातील काळोखाच्या ओंजळीत प्रकाशाचे दान देणे हे खरे पुण्यकर्म आहे. दान हे परोपकार, करुणा आणि दुसऱ्याच्या जीवनात आनंद निर्माण कराण्याचे माध्यम असून, स्वतःमधील अहंकार, स्वार्थ यांचा त्याग करून न में कर्मफले स्पृहा। या उक्तीनुसार निरपेक्ष भावनेतून कार्य करण्याचा अंगीकार करणे, अशा सद्गुणांचा स्वतःच्या व्यक्तिमत्त्वांमध्ये प्रभाव वाढून निर्माण होऊन आध्यात्मिक विकास आणि समाजकल्याणाची आस दोन्हींचा मिलाफ होऊन समृद्ध आणि समतोल व्यक्तिमत्त्व साकार होते. दानशीलतेमधे सहसंवेदना, सामाजिक उन्नयन, आर्थिक विषमता दूर करणे हा दृष्टिकोन अंतर्भूत असतो. मदर तेरेसा यांनी म्हटल्याप्रमाणे दान करताना ते दयेच्या संदर्भात नाही तर प्रेमाच्या संदर्भात व्हायला हवे. मनःशांती प्राप्त करण्याचा दान हा महत्त्वाचा दुवा आहे. त्याचबरोबर हेही लक्षात ठेवायला हवे, NO ONE HAS BECOME POOR BY GIVING, HAPPINESS DOESN'T RESULT FROM WHAT WE GET, BUT FROM WE GIVE हे मान्य केल्यास समाजामध्ये दानी व्यक्तींची शृंखला निर्माण होऊ शकेल.

'दान' केवळ अर्थसहाय्यापुरते सीमित नसून ज्ञानदान, आरोग्यदान, अन्नदान, खतदान, अवयवदान करून एखाद्याला जीवदान देणे, गरजूंना कपडे वाटप, अभयदान, वसुंधराला विषाणूमुक्त ठेवण्यासाठी सार्वजनिक ठिकाणी वृक्षलागवड, संवर्धन, पाण्याचे योग्य नियोजन, कचरा निर्मूलन मोहिमेला अधिक परिणामकारक बनविणे यासाठी केलेल्या प्रदानासारखे हे देखील दान व्याख्येस पात्र ठरू शकतात. पर्यावरण रक्षणाठी स्वतः दिलेल्या योगदानाचे फलित म्हणून वसुंधरा आपल्याला अन्नधान्य समृद्धी, आरोग्यसमुद्धी, निसर्गसमृद्धी सारेच काही भरभरून देत असते. अशी एक पेरीता उदंड देणारी धरणीमाता ही आपली आदर्श ठरावी. एक संस्कृत श्लोक आहे.

**परोपकाराय फलन्ति वृक्षाः। परोपकाराय वहन्ति नयः।**
**परोपकाराय दुहन्ति गावः। परोपकारार्थमिदं शरिरं ।**

याचा अर्थ सगळे प्राकृतिक तत्त्व जसे वृक्ष, नाद नदी, गाय हे सगळे आपली निःस्वार्थ सेवा करतात तसेच मानवानेही परोपकार किंवा त्याग करताना तो सेवाभावाने समर्पित असावा. आपल्या देशामध्ये विविध प्रकारचे सेवा प्रकल्प चालतात. त्यांच्याशी जोडल्या गेलेल्या व्यक्ती निरपेक्ष भावनेने समाजहितार्थ ज्ञानदान, समयदान, धनदान, श्रमदान, अन्नदान, पाणपोईचे निर्माण, गरीब मुलींच्या विवाहासाठी अर्थसहाय्य करणे अशा स्वरूपात कार्यरत आहेत.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे वनवासी एकल विद्यालय, संस्कार वर्ग, आरोग्यभारती आदिवासी भागात आरोग्य केंद्र, सामाजिक समरसता आणि ऐक्य वाढविणे आणि अस्पृश्यता निवारणार्थ पारधी बेड्यासारख्या वस्तीमध्ये सामुदायिक भोजनाचे कार्यक्रम आयोजित करणे, नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन, ग्रामविकास व स्वावलंबन प्रकल्प असे आणखी बरेच आहेत. त्याचप्रमाणे राष्ट्रसेविका समितीद्वारा आत्महत्याग्रस्त कुटुंबातील मुलींसाठी तेजस्विनी छात्रावास, जनकल्याण समितीद्वारा चालविण्यात येणारे डॉ. हेडगेवार हॉस्पीटल, गोवंश हत्या थांबविण्यासाठी अगा गाईचा प्रतिपाळ करण्यासाठी गोसंवर्धन स्थापन केलेला गोप्रकल्प, हिंदू संस्कारमूल्ये मुलींमधे रुजवून, त्यांना स्वावलंबी, देशप्रेमी बनविण्यासाठी बौद्धिक वर्गाचे आयोजन केले जाते. त्याचसोबत शंकरराव पापळकरांचा, अनाथ, अपंग, दिव्यांग लोकांचे पालकत्व स्वीकारून त्यांचे विवाह लावून देऊन त्यांना गृहस्थजीवनाचा आनंद मिळवून देणारा 'बइङ्गार' येथील अनाथाश्रमी कोडी व प्रकाश आमटे यांचा हेमलकसा येथील प्रकल्प, ज्याच्या माध्यमातून कुष्ठरोगी, आदिवासी यांना रोगमुक्त करून समाजाच्या, मुख्य विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा सेवायज्ञ अखंड सुरू आहे. त्याच सेवाभावाप्रमाणे वन्यपशूंना मित्र मानून, त्यांच्यावर प्रेम करून भूतदयेचा महान अविष्कार ही प्रकाश आणि मंदा आमटे यांच्या ठिकाणी आपल्याला पाहायला मिळतो. सुखासीन जीवनाचा त्याग करून आदिवासी दुर्गम भागाला आपली कर्मभूमी मानणे मानवता धर्माचे द्योतक आहे.

विनोबा भावेंच्या भूदानयज्ञामध्ये कितीतरी लोकांनी जमिनी दान केल्या होत्या, हेही आपल्याला माहिती आहे. धनिक लोकांनी जमिनी विकून अधिक धन मिळविण्याची लालसा सोडून भूमिहीनांसाठी त्यांचे दान करून आर्थिक विषमता कमी करण्यासाठी सहाय्य केले होते. येथे अनुल्लेखीत राहिलेले आणखी कितीतरी सेवाभावी व्यक्ती, संस्था आज अस्तित्वात आहेत. आपण त्यांची माहिती मिळवून त्या सत्कार्याला आपल्यालाही कसा सहभाग देता येईल याचा विचार करून त्या दानयज्ञाल आपलेही कोणत्याही स्वरूपातील दान व्हावे, सेवा, समर्पणशीलता, मानवता, राष्ट्रप्रेम या गुणांच्या तेजामुळे आपले 'दान' अधिक उजळून निघते. महिलांच्या सक्षमीकरणासाठी भारतीय स्त्रीशक्तीचे शिक्षण, आर्थिक स्वावलंबन, समानता आणि आत्मसन्मान या पंचसूत्रींवर आधारीत अनेक उपक्रम चालतात. त्यामध्ये तज्ज्ञांनी सामाजिक कार्यकर्त्यांनी आपल्या ज्ञानाचा, वेळेचा आणि अनुभवाचा जास्तीत जास्त प्रमाणात उपयोग करून जाणीव जागृती करणाऱ्या कार्यक्रमांची संख्या वाढविणे, बेटी बचाव, बेटी पढाव प्रधानमंत्री मातृवंदना योजना, मिरान शक्ती अशा अनेक योजनांची माहिती गरजू महिलांपर्यंत पोहोचविणे, शासनाच्या लालफितशाहीत रेंगाळलेली अशी प्रकरणे स्वतःच्या कायदेविषयक ज्ञानाचा वापर करून, दबावतंत्राचा वापर करून त्यासाठी आवश्यक असे प्रेशरग्रुप तयार करून लाभार्थींना लाभ मिळवून देणे हे सुद्धा आपले एकप्रकारचे दान कृत्यच आहे. अन्याय अत्याचारग्रस्त मुलींना न्याय मिळवून देण्यासाठी COM-MUNITY HELP GRAY स्थापन करून त्या माध्यमातून त्यांना आत्मनिर्भर बनविण्यासाठी उपाययोजनांचा आराखडा बनविणे, त्यांच्यासाठी असलेल्या पुनर्वसन संस्थांपर्यंत त्यांना पोहोचविणे हेही समाजहितकारी सतकृत्यच आहे. त्यासाठी स्वतःचे ज्ञान, अद्ययावत ठेवून माहिती व तंत्रज्ञानाचा वापर करून मदत करण्याच्या आपल्या इच्छेला प्रभावीपणे कार्यान्वित करू शकतो. याशिवाय आपण आणखीही काय करू शकतो?

निसर्ग समृद्धीसाठी झाडे लावा मोहीम झाडे जगवा मोहिमेसाठी जास्तीत जास्त जनजागृती करणे. धरतीला प्रदूषणमुक्त राखण्यासाठी, कापडी पिशव्यांचा वापर वाढवून प्लास्टीक पिशव्यांना हद्दपार करणे, जवळच्या अंतरासाठी वाहनांचा चापर टाळून, दूरच्या अंतरासाठी पब्लिक ट्रान्स्पोर्टचा वापर - वाहनातून उत्सर्जित होणारा कार्बनडाय ऑक्साईडमुळे शीसेचे प्रमाण वाढून होणारे वायूप्रदूषण, पाणी आणि जमिनीतील माती यांच्यावर होणाऱ्या दुष्परिणामामुळे मानवी आरोग्याला निर्माण होणारा धोका टाळणे आपल्याला तेवढी दक्षता सर्वांकडून घेतल्या जाणे अपेक्षित आहे. आपल्याकडून समाजस्वास्थ्यासाठी होणारे हे दान समजायला हरकत नाही. वैयक्तिक आणि सार्वजनिक ठिकाणी प्लास्टीक कचऱ्यासोबत प्लास्टीक जाळणे, जे आरोग्याला अतिशय घातक आहे, त्याबाबत अधिकाधिक जागृती घडवून आणणे तेही 'आधी केले मग सांगितले' म्हणजे या सत्कृत्याची स्वतःपासून सुरूवात करणे अपेक्षित आहे. आपल्या घराजवळ एखादी बाग असेल तर वृक्षप्रेमींचा ग्रुप तयार करून आठवड्यातून एक दिवस तेथे जाऊन स्वच्छता मोहीम राबवून वृक्षवाढीसाठी पोषक वातावरण तयार करू शकतो. घरातील निर्माल्य किंवा भाज्या अन् हे खड्डा खणून त्यातच विसर्जित करण्याचा संकल्प करायला हवा, वाहत्या पाण्यात ते सोडणे किंवा मोकळ्या जागेत टाकाणे जलप्रदूषण आणि वायूप्रदूषणाचा प्रादुर्भाव वाढविणारे आहे.

याशिवाय सामाजिक क्षेत्रातही आपले अमूल्य असे योगदान होऊ शकते. आजारी व्यक्ती, एक-एकटे राहणारे वृद्ध कुटुंब, अनाथ अपंगासाठी काम करणाऱ्या संस्थांना कौन्सिलिंगद्वारे मनाला उभारी देणे, औषधोपचारांसाठी सहाय्य करणे, त्यांचे एकाकीपण दूर करण्यासाठी त्यांच्यासाठी काही वेळ देऊन पुस्तके वाचून दाखविणे, वृत्तपत्रातील बातम्या वाचून दाखवून समाजाशी, दैनंदिन घडामोडींशी त्यांना जोडून ठेवून जगण्याची उमेद मिळवून देणे हेही आपल्याला सहज शक्य आहे. कम्युनिटी किचन ही सुद्धा राबविण्यास सोपी अशी योजना आहे. आठवड्यात कुणाच्याही घरी काही व्यक्तींनी एकत्र परस्पर सहकार्याने पोषक आहार संज्ञेस पात्र ठरणारा स्वयंपाक करून तो गरजूंपर्यंत पोहोचवायचा, म्हणजे अन्नदान, श्रमदान हे दोन्ही सत्पात्री दान घडू शकते. म्हणजेच दान हे केवळ धार्मिक नाही तर सामाजिक नैतिकता आणि माणुसकीचे कृत्य आहे हे त्रिकालाबाधीत सत्य आहे.

**(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)**